## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

# महामेट्रो आणि मनपाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना लास्ट माइल कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याकरिता सुरु केली विशेष फीडर बस सेवा



नागपूर : विद्यार्थ्यांमध्ये मेट्रो सेवा वापरण्याचे प्रोत्साहन देण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी महामेट्रोने नागपूर महानगरपालिकाच्या संयुक्त विद्यमानाने शहरातील दोन प्रमुख शैक्षणिक संस्थांना जोडणारी विशेष फीडर बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांसाठी प्रवासाच्या पर्यायांची सुसंगतता साधणे आहे, ज्यामुळे त्यांना मेट्रो स्थानकांपासून त्यांच्या शैक्षणिक संस्थांपर्यंत सहजपणे पोहोचता येईल आणि नागपूरमधील वाहतूक कोंडी आणि हवेच्या प्रदूषणात घट होईल.

ही सेवा महा मेट्रोने शासकीय अभियांत्रिक महाविद्यालय, वर्धा रोड आणि अॅ्लन कोचिंग क्लासेस, सुभाष नगर येथे आयोजित मेट्रो संवाद या कार्यक्रमानंतर सुरू केली. शासकीय अभियांत्रिक महाविद्यालयात दररोज सुमारे १,५०० विद्यार्थी आणि अॅरलन कोचिंग क्लासेसला ९,००० विद्यार्थी शहरातील विविध भागांहून येत असतात. या पार्श्वभूमीवर, महा मेट्रोने दोन्ही संस्थांना भेट देऊन विद्यार्थ्यांना सार्वजनिक वाहतूक वापरण्या संदर्भात मार्गदर्शन करता केले.

रस्त्यावरील वाढत्या वाहनांची संख्या ही वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरली असून, यामुळे प्रदूषण आणि हवेची गुणवत्ता खराब होत आहे. यावर उपाय म्हणून, दोन्ही संस्थांच्या व्यवस्थापनाने शासकीय पायाभूत सुविधांवर ताण कमी करण्यासाठी पर्यावरणास अनुकूल, टिकाऊ वाहतूक पर्यायाची गरज ओळखली. महामेट्रो, जी नागपूरमधील सर्वात हरित (eco-friendly) वाहतूक व्यवस्था आहे, विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श पर्याय म्हणून मेट्रो सेवा प्रदान करते तसेच मेट्रो सेवा हि विद्यार्थी अनुकूल टिकीट दरात ३०% सवलत प्रदान करत असल्यामुळे ते विद्यार्थ्यांसाठी आकर्षक ठरते.

मेट्रो संवाद कार्यक्रमात संस्थांतील विद्यार्थ्यांनी आणि व्यवस्थापनाने सकारात्मक स्वागत केले. या सत्रांमध्ये मेट्रोच्या प्रवासाचे फायदे, जसे की त्याची किफायतशीरता, पर्यावरणास अनुकूलता, आणि कार्यक्षमता यावर चर्चा करण्यात आली.

विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आणि लास्ट माइल कनेक्टिव्हिटीच्या समस्येवर उपाय म्हणून, महामेट्रोने नागपूर महानगरपालिका सोबत समन्वय साधून दोन विशेष फीडर बस सेवा सुरू केली आहेत. या बस सेवा विद्यार्थ्यांना मेट्रो स्थानकांपासून त्यांच्या शैक्षणिक संस्थांपर्यंत सोयीस्करपणे पोहोचवतील, म्हणजे शासकीय अभियांत्रिक महाविद्यालयासाठी न्यू एअरपोर्ट मेट्रो स्थानक आणि अॅपलन कोचिंग क्लासेससाठी सुभाष नगर मेट्रो स्थानक.

२६ नोव्हेंबर २०२४ पासून शासकीय अभियांत्रिक महाविद्यालय आणि न्यू एअरपोर्ट मेट्रो स्थानक यांच्यात विशेष फीडर बस सेवा सुरु करण्यात आली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मेट्रो नेटवर्कपर्यंत सहजपणे पोहोचता येईल. त्याचप्रमाणे, २९ नोव्हेंबर २०२४ पासून सुभाष नगर मेट्रो स्थानक आणि सुभाष नगर येथील अॅ लन कोचिंग क्लासेस यांच्यात समान सेवा सुरू होईल.

हे नवीन फीडर बस मार्ग मेट्रोच्या विद्यमान सेवांसोबत सुसंगत असतील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना सुलभ, जलद, आणि विश्वसनीय कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. या सेवा सुरु झाल्याने सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्यास मदत होईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये दुचाकी वाहनांचा वापर कमी होईल आणि नागपूरच्या रस्त्यांवरील कोंडी कमी होईल.